MY रायगड
पुढारी
बुधवार, १२ डिसेंबर २०१८

# आदिवासी महिलांना पोषण आहाराविषयी मार्गदर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा यांच्यावतीने आदिवासी शेतकरी महिलांना पोषण आहाराचे महत्त्व समजावून पोषक आहारासाठी आवश्यक पिकांच्या लागवडीकरिता शेतकऱ्यांमध्ये जनजागृती होणे व पिक उत्पादन कार्यक्रमात सहभाग घेणे, याविषयी मार्गदर्शन व पोषण आहार म्हणून नाचणी सत्वयुक्त पौष्टिक बिस्कीटांचे वाटप सोमवारी तालुक्यातील मटके आदिवासीवाडी येथे करण्यात आले.



या कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे विषयतज्ज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, डॉ. राजेश मांजरेकर, घोसाळा ग्रा. पं. सदस्य गणेश गुडेकर, शेतकरी प्रतिनिधी मधुकर जाधव, विवेकानंद संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे प्रसाद दगडे, शाळा शिक्षक कुंडे, खोपले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रमोद मांडवकर यांनी पोषण आहाराचे उच्चमुल्य असलेल्या नाचणी लागवडीकरीता शेतकऱ्यांना उद्युक्त करून पुढील खरीप हंगामात पिक प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले. शेळीपालन, परसबागेतील कुक्कटपालन व्यवसायाविषयी बचत गटाला माहीती दिली. तर डॉ. राजेश मांजरेकर यांनी परसबागेतील भाजीपाला लागवड तंत्रज्ञान व फळे, भाजीपाला यांचे आहारातील महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित महिलांना व विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४०० ग्रॅम नाचणी बिस्कीटांचे वाटप करण्यात आले. याचा लाभ मुटके आदिवासीवाडी मधील ११० महिला व ३० विद्यार्थ्यांनी घेतला.